**Publication:** Saamna
**Date:** 25/10/2013
**Edition:** Mumbai
**Page No:** 11
**Headline:** Sanyam Satia & Mihir Belgaonkar from DAV Public School are Mumbai's 'Smart Tech Wizards'

# डीएव्ही स्कूलचे सन्याम व मिहीर स्मार्ट टेक विझार्डस्

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) - टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात आंतर शालेय आयटी क्वीझ उपक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये मुंबई पर्वाच्या क्षेत्रीय अंतिम फेरीमध्ये डीएव्ही पब्लिक स्कूलच्या सन्याम साटिया व मिहीर बेळगावकर यांनी बाजी मारली आहे. तर आयआयटीयन्स पेस ॲकॅडमीच्या व्योम किशोर सिंग व पुलकित अग्रवाल उपविजेते ठरले आहेत. विजेत्यांना प्रत्येकी एक आयपॅड तसेच उपविजेत्यांना गॅलेक्सी टॅब्लेट देण्यात आला. या टीसीएस आयटी विझमध्ये मुंबईच्या विविध शाळांमधून ११०० विद्यार्थी सहभागी झाले होते. विजेते स्मार्ट टेक विझार्डस्च्या किताबाकरिता मुंबईचे प्रतिनिधित्व करणार आहेत.